**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ५२/२०१९** **दिनांक २८/०६/२०१९** **कालावधी ५ दिवस**


| | | |
|---|---|---|
| **डॉ. अशोककुमार चव्हाण,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२२३७३३९६ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २२/०६/२०१९ ते २८/०६/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २९/०६/२०१९ सकाळी ८:३० पासून ०३/०७/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २२/०६ | २३/०६ | २४/०६ | २५/०६ | २६/०६ | २७/०६ | २८/०६ | | २९/०६ | ३०/०६ | ०१/०७ | ०२/०७ | ०३/०७ |
| १.४ | २.५ | १०.० | ८.८ | ०.० | ३४.० | २०६.२ | पाऊस (मिमी) | १२२ | ८४ | ७९ | ६० | ६२ |
| ३१.५ | ३१.० | ३०.० | ३०.० | ३१.० | ३१.० | २६.० | कमाल तापमान (अं.से) | २९ | ३० | ३० | ३० | ३० |
| २५.० | २५.० | २४.० | २४.६ | २५.५ | २४.५ | २३.० | किमान तापमान (अं.से) | २४ | २५ | २५ | २५ | २५ |
| ६ | ६ | ६ | ६ | ४ | ६ | ६ | मेघाच्छादन (ऑक्टा) | ८ | ८ | ८ | ८ | ८ |
| ८६ | ९७ | ९२ | ९३ | ९२ | ९८ | १०० | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ९३ | ९३ | ९१ | ९१ | ९२ |
| ७२ | ८२ | ९८ | ७८ | ९० | ९८ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ८६ | ८९ | ८४ | ७४ | ७८ |
| ४.० | ४.० | २.१ | २.५ | ४.६ | ५.० | ७.० | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १४ | १२ | ११ | ६ | ७ |
| नै. | नै. | प. | नै. | नै. | प. | प. | वाऱ्याची दिशा | नै.प. | प. | प. | नै.द. | द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | आठवड्याची सरासरी (मिमी) | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|---|
| १२१.९ | २४४.१ | २९१.३ | ३०७१.८ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक २९ जून ते ३ जुलै, २०१९ पर्यंत मध्यम ते जास्त पावसाची शक्यता असून वाऱ्याच्या वेगात ६ ते १४ कि.मी./तास वाढ संभवते.**

**दिनांक २८ जून ते ४ जुलै, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा जास्त राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भात** | **रोपवाटीका** | • लागवड करावयाच्या भात क्षेत्रामध्ये नांगरट करावी व नांगरणीच्या वेळी हेक्टरी ७.५ टन शेणखत किंवा कंपोस्ट जमिनीत एकसारखे मिसळावे.<br>• भात क्षेत्रातील बांधाची बांधबंधीस्ती करावी.<br>• मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता रोपवाटीकेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी.<br>• पुर्नलागवडीसाठी भाताची १२ ते १५ सें.मी. उंचीची पाच ते सहा पाने फुटलेली २० ते २७ दिवसांची रोपे योग्य असतात. यामध्ये हळव्या जातींसाठी २० दिवसांची आणि निमगरव्या आणि गरव्या जातींसाठी २७ ते ३० दिवसांची रोपे योग्य असतात.<br>• भात पिकाची पुर्नलागवड करण्यापूर्वी चिखलणी करावी. चिखलणीच्या वेळेस हेक्टरी ८७ कि.ग्रॅ. युरिया, ३१३ कि.ग्रॅ. सिंगल सुपर फोस्फेट आणि ८४ कि.ग्रॅ. म्युरेट ऑफ पोटश खते मिसळावे. गिरीपुष्पाचा पाला चिखलणीच्या वेळीस गाडल्यास ५० टक्के नत्र खताची (युरिया) मात्रा कमी घ्यावी.<br>• भात पिकाची पुर्नलागवड १५ X १५ सें.मी.(हळव्या जातींसाठी) किंवा २० X १५ सें.मी.(निमगरव्या व गरव्या जातींसाठी) व अंतरावर करावी. लावणी सरळ आणि उथळ २.५ ते ३.५ सें.मी. खोल करावी. उथळ लावणी केल्याने फुटवे चांगले येतात. एका चुडामध्ये दोन ते तीन रोपे लावावीत आणि संकरीत भातासाठी एका ठिकाणी एकच रोप लावावे.<br>• बांधावरील खेकड्यांचा बंदोबस्त करावा त्यासाठी १ किलो शिजलेल्या भातामध्ये ७५ टक्के पाण्यात मिसळणारी ॲसिफेट पावडर ७५ ग्रॅम टाकून विषारी अमिष तयार करावे. या मिश्रणाच्या साधारणपणे १०० गोळ्या तयार करून प्रत्येक बिलाच्या आत तोंडाशी एक गोळी ठेवावी व बीळ बुजवावे, दुसऱ्या दिवशी जी बिळे उकरली जातील अशा बिळात परत अमिष वापरावे. |
| **नागली** | **रोपवाटीका** | • पेरणीनंतर १५ दिवसांनी प्रति गुंठा क्षेत्रास १ कि.ग्रॅ. युरिया खताचा दुसरा हप्ता देण्यात यावा.<br>• लागवड करावयाच्या क्षेत्रामध्ये नांगरट करावी व नांगरणीच्या वेळी हेक्टरी ७.५ टन शेणखत किंवा कंपोस्ट जमिनीत एकसारखे मिसळावे. |
| **चिकू** | - | • चिकू फळांची पावसाळ्यात बुरशीजन्य रोगामुळे होणाऱ्या फळगळीच्या नियंत्रणासाठी १ टक्का बोर्डोमिश्रणाची दुसरी फवारणी करावी. |
| **भाजीपाला/ फळबाग रोपवाटीका** | **लागवड** | • भाजीपाला पिकांच्या रोपवाटिकेला पाण्याचा ताण बसत असल्यास पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• वांगी व मिरची पिकांची रोपे लागवडीयोग्य झाली असल्यास पुर्नलागवड करावी. पुर्नलागवड करतेवेळी रोपे डायमिथोएट १ मि. ली. प्रति लिटर पाण्याच्या द्रावणात ५ मिनिटे बुडवावी. लागवड सरीवरंब्यावर ६० x ६० से.मी. अंतरावर करावी. लागवडीच्या वेळेस प्रती एकरी ८ टन शेणखत, ४३ कि.ग्रॅ. युरिया (वांगी पिकासाठी) ८६ कि.ग्रॅ. युरिया (मिरची पिकासाठी), १२५ कि.ग्रॅ. सिंगल सुपर फोस्फेट आणि ३३ कि.ग्रॅ. म्युरेट ऑफ पोटश खताची मात्र द्यावी. लागवडीनंतर लगेच पाणी द्यावे. |

| | | |
|---|---|---|
| | | • वेलवर्गीय भाजीपाला पिकांना काठीचा आधार दयावा किंवा मंडपाची व्यवस्था करावी.<br>• रोपवाटीकेतील पाण्याचा निचरा होण्यासाठी व्यवस्था करावी. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन** | **-** | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच शेड मध्ये हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी.<br>• जनावरांचे येणाऱ्या पाऊसापासून योग्य ते संरक्षण करावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**